(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

एस. सी. आर. ७६७

१२ मार्च १९५३

बँकुरा नगर पालिकेचा अध्यक्ष

वि.

लालजी राजा आणि सन्स

**[मेहरचंद महाजन आणि भगवती न्या. न्या. ]**

कलकत्ता उच्च न्यायालयाचे नियम, भाग १, प्रकरण ११, नियम ९ – एकल न्यायाधीशाची अधिकाराता – "मालमत्ता समपहरणाचा आदेश" – मालमत्ता समपहरणासाठी, नगरपालिका कायद्यांतर्गत अस्वास्थ्यकर अन्नाची विल्हेवाट लावण्याचे निर्देश देणारा आदेशाचा अर्थ – समपहरण असो वा – बंगाल नगरपालिका कायदा, १९३२, कलम ४२८, ४३१, ४३२.

बंगाल नगरपालिका कायद्याच्या (१९३२ चा पंधरावा) च्या उपकलम ४३१, ४३२ अन्वये जिल्हा दंडाधिकाऱ्यांचा सदर कायद्याच्या कलम ४२८ अंतर्गत जप्त केलेल्या अन्नाची विल्हेवाट लावण्यासाठी चा आदेश हा कलकत्ता उच्च न्यायालयाच्या नियमातील भाग २ च्या प्रकरण २ मधील नियम ९ च्या परंतुकातील मालमत्तेच्या समपहरणाच्या आदेशाच्या अर्थामध्ये

बसत नाही आणि उक्त उच्च न्यायालयाच्या एकल न्यायधिशांना अशा आदेशाचे निर्देशन ऐकण्याची अधिकारिता आहे.

जोपर्यंत मालमत्तेचे नुकसान किंवा वंचितता एखाद्या अपराधासाठी, गुन्ह्यासाठी किंवा कराराचा भंग केल्याबद्दल दंड किंवा शिक्षा म्हणून होत नाही तोपर्यंत ते मालमत्तेचे "समपहरण" म्हणून गणले जाणार नाही.

फौजदारी अपीलीय अधिकारिता : १९५२ चा फौजदारी अपील क्रमांक २३.

१९५१ च्या फौजदारी निर्देशन प्रकरण क्रमांक ११० मधील कलकत्ता उच्च न्यायालयाच्या (चंदर न्या. ) १८ जानेवारी १९५२ रोजीच्या आदेशावरून अपील.

अपीलकर्त्यासाठी एन. सी. तालुकादार आणि ए. डी. दत्त.

उत्तरवादींसाठी अजित कुमार दत्ता आणि एस. एन. मुखर्जी.

१९५३ मार्च १२ न्यायालयाचा न्यायनिर्णय पारीत

भागवती न्या. – हे संविधानाच्या कलम १३४ (सी) अंतर्गत केलेले अपील आहे आणि कलकत्ता येथील उच्च न्यायालयाचे एकल न्यायाधीश, बंगाल नगरपालिका १९३२ चा १५ व्या कायदाच्या कलम ४३१ आणि ४३२ अंतर्गत दिलेल्या आदेशाच्या निर्देशनाची सुनावणी करू शकतात का, हा मुद्दा उपस्थित होतो.

फौजदारी प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांची अधिकारिता उच्च न्यायालयाच्या नियमातील भाग १ च्या प्रकरण २ मधील नियम ९ च्या परंतुकात परिभाषित केली आहे. परंतुकांचा संबंधित भाग खालीलप्रमाणे आहेः

“परंतु एकल न्यायाधीश खालील बाबींव्यतिरिक्त कोणतेही अपील, निर्देशन किंवा पुनरीक्षणच्या अर्जाची सुनावणी करू शकेलः

(१) मृत्युदंड, वाहतूक, सक्त मजुरी, मालमत्ता समपहरण किंवा तुरुंगवासाच्या आदेशाशी संबंधित, दंड भरण्यात चूक झाल्यास तुरुंगवासाचा आदेश नाही.......”

त्यामुळे मालमत्ता समपहरणच्या आदेशाशी संबंधित कोणतेही निर्देशन किंवा पुनरीक्षणासाठीच्या अर्ज हाताळण्याची अधिकारिता एकल न्यायाधीशाला नाही आणि या अपीलात उद्भवणारा प्रश्न असा आहे की बँकुराच्या विद्वान जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी बंगाल नगरपालिका कायदा, १९३२ च्या कलम ४३१ आणि ४३२ अंतर्गत दिलेला आदेश हा वरील परंतुकांच्या अर्थांतर्गत मालमत्ता समपहरणचा आदेश आहे का?

संबंधित तथ्ये थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत. येथील उत्तरवादी बँकुरा नगरपालिकेतील बँकुरा शहरातील अनेक तेल गिरण्यांचे मालक आहेत. नगरपालिकेच्या स्वच्छता निरीक्षकाला ६ मार्च १९५० रोजी अशी माहिती मिळाली की उत्तरवादींच्या मालकीच्या श्री गौरंगा तेल गिरणीच्या व्यवस्थापकाने श्री हंसेस्वर माजी यांच्या तांदूळ गिरणीच्या आवारात कुजलेल्या, सडलेल्या, अस्वास्थ्यकर मोहरीच्या सुमारे ३०० पिशव्या आणि अस्वास्थ्यकर मोहरीच्या सुमारे ६०० पिशव्या उत्तरवादींच्या गिरणीच्या गोदामात विक्रीसाठी आणि

विक्रीसाठी तेल तयार करण्यासाठी ठेवल्या आहेत. त्या वतीने त्यांनी केलेल्या अर्जावर, उपविभागीय अधिकारी, बँकुरा यांनी योग्यरित्या तपास वॉरंट जारी केले आणि त्याच दिवशी स्वच्छता निरीक्षकांना उत्तरवादींच्या ताब्यात मोहरीच्या बियांचा एक मोठा साठा आढळला जो अत्यंत अस्वास्थ्यकर आणि मानवी उपभोगासाठी अयोग्य असल्याचे आढळून आले. त्यांनी ६ मार्च १९५० आणि ८ मार्च १९५० च्या दरम्यान ही सदर बियाणे जप्त केले आणि जप्ती संपल्यानंतर त्यांनी उत्तरवादींकडे सदर मोहरी बियाणाचा नाश करण्यासाठी लेखी संमती मागितली, ज्याला त्यांनी नकार दिला म्हणून  सॅनिटरी इन्स्पेक्टर यांनी अशा प्रकारे सर्व ९५११/२  जप्त केलेल्या पिशव्या उत्तरवादींच्या  संमतीने त्यांच्या  गिरणांच्या गोदामात ठेवल्या. या अपीलाच्या उद्देशाने उल्लेख करण्याची आवश्यकता नसलेल्या अनेक कार्यवाहीनंतर, जिल्हा दंडाधिकारी, बँकुरा यांना १४  ऑगस्ट १९५१ रोजी, बंगाल नगरपालिका कायद्याच्या कलम ४३१ आणि ४३२ अंतर्गत एम. पी. क्रमांक ५८/१९५० मध्ये असे आढळून आले की  ६ मार्च १९५० रोजी जप्त करण्यात आलेला मोहरीच्या बियांचा साठा त्या तारखेला होता आणि अजूनही ही तो मानवी वापरासाठी अयोग्य होता. परंतु जोपर्यंत बियाण्यांमधून कोणतेही तेल येत नव्हते आणि बियाणे खत म्हणून किंवा गुरांच्या अन्नासाठी वापरण्यास सक्षम नव्हते, तोपर्यंत त्यांनी त्यांचा नाश करण्याचे निर्देश दिले नाहीत, परंतु बँकुरा नगरपालिकेच्या आयुक्तांनी त्यांची खते म्हणून किंवा गुरांचे अन्न म्हणून विल्हेवाट लावण्याचे निर्देश दिले, जेणेकरून त्यापूर्वी हे सुनिश्चित केले जाईल की संबंधित साठा मानवी अन्न म्हणून वापरण्यास असमर्थ ठरला आहे. उत्तरवादींनी जिल्हाधिकाऱ्यांच्या उच्च न्यायालयाकडे  निर्देशनासाठीच्या केलेल्या आदेशाविरोधात दंड प्रक्रिया संहितेच्या कलम ४३५ अन्वये बँकुरा येथील अतिरिक्त

सत्र न्यायाधीशांसमोर याचिका दाखल केली. सत्र न्यायाधीशांनी असा निर्णय दिला की मोहरीचे बियाणे जप्त करणे बेकायदेशीर आहे आणि संबंधित बियाणे त्यांच्या विक्रीसाठी किंवा मानवी उपभोगासाठी तेल तयार करण्याच्या उद्देशाने ठेवण्यात आले होते किंवा त्या ठिकाणी आणले गेले होते हे दर्शविण्यासाठी कोणताही पुरावा नाही. त्यामुळे त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३८ अंतर्गत कार्यवाही रद्दबातल करण्यासाठी उच्च न्यायालयात निर्देशन केले . न्यायाधीश चंदर यांनी निर्देश स्वीकारला, जिल्हा दंडाधिकाऱ्यांचा आदेश रद्दबातल केला आणि हे प्रकरणं दुसऱ्या दंडाधिकाऱ्यांकडे पुन्हा सुनावणीसाठी पाठवले, कारण विद्वान न्यायाधीशाच्या मते, जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी मोहरीच्या बियाण्यांच्या तपासणीदरम्यान केलेल्या स्वतःच्या निरीक्षणांवरून या प्रकरणाचा निर्णय घेतला होता आणि अभिलेखावर असलेल्या सामग्रीवर नाही. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडे अर्ज करण्यात आला आणि वर उद्धृत केलेल्या नियमाच्या पार्श्वभूमीवर निर्देशन सुनावणीसाठी न्यायाधीश चंदर यांना एकल बसण्याचा अधिकार आहे की नाही या मुद्द्यावर परवानगी देण्यात आली.

बंगाल नगरपालिका कायदा, १९३२ च्या कलम ४३१ आणि ४३२ अंतर्गत बँकुराचे जिल्हा दंडाधिकारी यांनी दिलेला आदेश हा नियमाच्या परंतुकातील अर्थानुसार मालमत्ता समपहरण करण्याचा आदेश होता आणि न्या. चंदर यांना निर्देशन हाताळण्याची अधिकारिता नव्हती आणि त्याचा आदेश रद्द केला पाहिजे अशी विनंती अपीलकर्त्यांच्या वतीने श्री. एन. सी. तालिकदार यांनी केली.

कलम ४३१ तरतूद करतेः-

" (१) कलम ४२८ अन्वये जप्त केलेली कोणतीही जिवंत वस्तू, अन्नपदार्थ,औषध, कलम ४२९ चे उपकलम (१) अन्वये संमतीने नष्ट केले जात नसतील किंवा अशा प्रकारे जप्त केलेले नाशवंत अन्नपदार्थ त्या कलमाच्या उपकलम (२) अन्वये हाताळले जात नसतील, तर ते अशा प्रकारच्या जप्तीनंतर लवकरात लवकर दंडाधिकाऱ्यांसमोर घेतले जाईल.

(२) जर दंडाधिकाऱ्यांना असे वाटत असेल की अशी कोणतीही जिवंत वस्तू रोगग्रस्त किंवा अस्वास्थ्यकर आहे किंवा असे कोणतेही अन्न किंवा औषध अस्वास्थ्यकर, किंवा मानवी अन्नासाठी किंवा औषधांसाठी अस्वास्थ्यकर किंवा अयोग्य आहे, असे असले तरीही ते जप्तीच्या वेळी ज्या व्यक्तीच्या ताब्यात होते त्या व्यक्तीच्या खर्चाने ते नष्ट केले जाईल किंवा आयुक्तांकडून अन्यथा विल्हेवाट लावेल जेणेकरून तो मानवी अन्न किंवा औषध म्हणून वापरण्यास सक्षम होणार नाही.

कलम ४३२ तरतूद करतेः-

"जेव्हा कोणतेही प्राधिकरण या प्रकरणाद्वारे प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करून, कोणत्याही जिवंत वस्तूचा, अन्नाचा किंवा कोणत्याही औषधाचा नाश करण्याचे किंवा त्याचा अन्न किंवा औषध म्हणून वापर होण्यापासून रोखण्यासाठी त्याची विल्हेवाट लावण्याचे निर्देश देते , तेव्हा ती आयुक्तांची मालमत्ता असल्याचे मानले जाईल."

"समपहरण " या शब्दाची व्याख्या मरेच्या ऑक्सफर्ड शब्दकोशात केली आहे : "एखाद्या अपराधाच्या, गुन्ह्याच्या किंवा कराराराच्या उल्लंघनाच्या परिणामी वस्तू गमावणे किंवा वंचित राहणे ही वस्तुस्थिती 'उत्क्रमणाचा दंड' किंवा 'गुन्ह्यासाठी शिक्षा' आहे.” असा

युक्तिवाद करण्यात आला की कलम ४३२ मध्ये आयुक्तांकडे निषिद्ध अन्न किंवा औषध निहितीकरणाची तरतूद करण्यात आली आहे, तोपर्यंत मालमत्तेचा मालक हा त्यातील मालकी हक्कापासून वियुत किंवा वंचित ठेवण्यात आला होता आणि कलम ४३१(२) अंतर्गत दंडाधिकाऱ्यांनी दिलेला आदेश हा अशा प्रकारे मालमत्तेच्या समपहरणचा आदेश होता.

आमच्या मते हा युक्तिवाद चुकीचा आहे. शब्दकोशात 'समपहरण ' या शब्दाचा अर्थ हा एखाद्या अपराधाचा, गुन्ह्याचा किंवा कराराचा भंग केल्याचा परिणाम म्हणून एखादी वस्तू गमावणे किंवा त्याचे वंचितीकरण असावे किंवा उत्क्रमणाचा दंड किंवा एखाद्या गुन्ह्यासाठी शिक्षा म्हणून असायला हवा. जोपर्यंत वस्तू गमावणे किंवा त्याचे वंचितीकरण हे एखाद्या अपराधासाठी किंवा कराराचा भंग केल्याबद्दल दंड किंवा शिक्षा म्हणून दिला जात नाही, तोपर्यंत तो समपहरणाच्या व्याख्येत येणार नाही. कलम ४३१(२) अंतर्गत जी तरतूद करण्यात आली आहे ती म्हणजे मानवी अन्न किंवा औषधासाठी अस्वास्थ्यकर, अनिष्ट किंवा अयोग्य असलेले अन्न किंवा औषध नष्ट करणे किंवा अन्यथा आयुक्तांकडून त्याची विल्हेवाट लावणे जेणेकरून ते मानवी अन्न किंवा औषध म्हणून वापरण्यास सक्षम होणार नाही. कलम ४३२ तरतुदींद्वारे असे निषिद्ध अन्न किंवा औषध आयुक्तांकडे निहित करणे हे आयुक्तांद्वारे असे अन्न किंवा औषधाचा नाश करणे किंवा अन्यथा विल्हेवाट लावणे सुलभ करण्याच्या उद्देशाने आहे आणि नगरपालिकेकडून अशा प्रकारचे अन्न किंवा औषध कोणत्याही प्रकारे समपहरण केले जात नाही. कोणत्याही प्रकारे असे निषिद्ध अन्न किंवा औषध हे अस्वास्थ्यकर , अनिष्ठ किंवा अयोग्य असल्याचे आढळल्यामुळे ते मालकाद्वारे हाताळले जाऊ शकत नाही. त्याचा मानवी

अन्न किंवा औषध म्हणून वापर होऊ नये म्हणून तो नष्ट करणे किंवा अन्यथा विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. त्यामुळे पालिका आयुक्तांना जे करण्याचा अधिकार आहे, ते मालकाने स्वतः करणे अपेक्षित आहे आणि त्यामुळे जे करण्याचे आदेश दिले जातात, ते मालमत्तेचे समपहरण करणे असू शकत नाही. हा आदेश एखाद्या गुन्ह्यासाठी शिक्षा नाही, तर निषिद्ध अन्न किंवा औषध मानवी अन्न किंवा औषध म्हणून वापरले जात नाही याची खात्री करण्यासाठी एक उपाय आहे.

ही खरी स्थिती आहे की हे कायद्याच्या चौदाव्या प्रकरणाच्या दृष्टिकोनातून स्पष्ट होते, ज्यामध्ये दंडाची तरतूद आहे. कलम ५०१ ते ५०४ विशिष्ट गुन्ह्यांसाठी दंडाची तरतूद करतात आणि कलम ५०० त्यात नमूद केलेल्या अनेक गुन्ह्यांसाठी दंडाची तरतूद करते. तथापि, कलम ४३१ त्यात समाविष्ट नाही.

त्यामुळे मालमत्ता समपहरण हा बंगाल नगरपालिका कायद्यात नमूद केलेल्या कोणत्याही गुन्ह्यासाठी एखादा दंड किंवा नाही. उच्च न्यायालयाच्या नियमातील संबंधित तरतुदीत मृत्यूदंडाची शिक्षा, वाहतूक, सक्तमजुरीची शिक्षा, मालमत्ता समपहरण किंवा तुरुंगवास आणि मुलांची शिक्षा यांचा आदेश एकत्रित केला आहे. हे आदेश केवळ अपराध किंवा गुन्हे केल्याबद्दल दंड किंवा शिक्षा म्हणून दिलेले आदेश आहेत आणि त्यात नमूद केलेल्या मालमत्तेचे समपहरण, जो अपराध किंवा गुन्हा केल्याच्या परिणामी लागू होतो, त्याशिवाय दुसरे काहीही नाही. मालमत्तेचे अशाप्रकारे समपहरण हे एकल न्यायाधीशाच्या अधिकारतेला अडथळा आणेल यासाठी त्या मालमत्तेचे समपहरण हे एखाद्या अपराधासाठी किंवा

गुन्ह्यासाठी दंड किंवा शिक्षेद्वारे तरतूद म्हणून असावे. त्यांचे परिश्रम असूनही श्री. एन. सी. तालुकदार आम्हाला बंगाल नगरपालिका कायदा, १९३२ ची कोणतीही तरतूद दर्शवू शकले नाहीत, जी कलम ४३१(२) अंतर्गत विचारात घेतली गेली आहे, जी एखादा अपराध किंवा गुन्हा केल्याबद्दल दंड किंवा शिक्षा म्हणून योजली आहे. उत्तरवावादींवर ज्या गुन्ह्याचा आरोप लावला जाऊ शकतो तो कायद्याच्या कलम ४२१ मध्ये परिभाषित केला आहे आणि कलम ५०० मध्ये त्या गुन्ह्यासाठी दंड आहे या शिक्षेची तरतूद आहे आणि समपहरणाची नाही.

त्यामुळे आमचे असे मत आहे की बँकुराच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी १४ ऑगस्ट १९५१ रोजी बंगाल नगरपालिका कायदा, १९३२ च्या कलम ४३१ आणि ४३२ अंतर्गत दिलेला आदेश हा उच्च न्यायालयाच्या नियमातील भाग १ च्या प्रकरण २ मधील नियम ९ च्यापरंतुकांच्या अर्थानुसार मालमत्ता समपहरण करण्याचा आदेश नव्हता आणि न्यायाधीश चंदर यांना निर्देशन स्वीकारण्याचा आणि त्यावर निर्णय घेण्याची अधिकारता होती . याचा परिणाम असा होतो की अपील निष्फळ होते आणि फेटाळले जाते.

अपील फेटाळण्यात आली.

अपीलकर्त्याचा अभिकर्ता : सुकुमार घोष.

उत्तरवादीसाठी अभिकर्ता : आर. आर. बिस्वास.

-----------------

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x